# महिला सक्षमीकरण आणि शासनाच्या योजना : एक समग्र दृष्टीकोन

संशोधक **आरती कृष्णा पाटील** B.Ed.-M.Ed.(एकात्मिक) शिक्षणशास्त्र अधिविभाग शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
मार्गदर्शक **डॉ .विद्यानंद संभाजी खंडागळे** शिक्षणशास्त्र अधिविभाग शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

---

**सारांश**

सक्षमीकरण म्हणजे आत्मनिर्भर बनवणे . " ८ मार्च हा दिवस आंतरराष्ट्रीय महिला दिन महिला दिन म्हणून जगभर साजरा होत आहे ''. समाज आणि कुटूंबाच्या उज्वल भविष्याकरिता महिला सक्षमीकरणाची आवश्यकता आहे. महिला सक्षमीकरण म्हणजे महिलांना त्याच्या वैयक्तिक व सामाजिक ,आर्थिक , राजकीय विकासासाठी स्वतःचे निर्णय घेण्यास सक्षम करणे तसेच महिलांना त्यांच्या हक्काची जाणीव करून देणे, त्यांना स्वावलंबी आत्मनिर्भर बनवणे, त्यांचे सर्व निर्णय स्वतः घेण्यास सक्षम करणे. बऱ्याच संघर्षानंतर स्त्रियांना मतदानाचा अधिकार, मालमत्तेचा अधिकार, नागरी हक्क, विवाह आणि नौकरीच्या बाबतीत कायदेशीर संरक्षण मिळाले आहे. संयुक्त राष्ट्र संघटनेने १९७५ हे " आंतरराष्ट्रीय महिला वर्ष " म्हणून घोषित केले आहे . भारतात महिलांना २६ जानेवारी १९५० रोजी भारतीय राज्यघटना लागू झाल्यावर सार्वत्रिक मतदानाचा अधिकार मिळाला त्यानंतर १९५१ -५२ मध्ये झालेल्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीत भारतीय महिलांनी मोठ्या प्रमाणावर अधिकार बजावला या संशोधनाचा उद्देश पुढील गोष्टी स्पष्ट करणे आहे , महिला सक्षमीकरण संकल्पना समजून घेणे , महिला सक्षमीकरणासाठी शासनाच्या योजनांचा शोध घेणे. महिला सक्षमीकरणाचे परिणामकारकतेचा शोध घेणे . हे संशोधन प्रामुख्याने सर्वेक्षण आणि वर्णनात्मक स्वरूपाचे आहे. प्रस्तुत संशोधनातून निष्कर्ष प्रतीत होतो कि, महिला सक्षमीकरणाचा खरा अर्थ तेव्हा समजेल, महिलांना चांगले शिक्षण दिल्याने त्यांना प्रत्येक क्षेत्रात स्वतंत्रपणे निर्णय घेण्यास सक्षम बनवण्यास मदत होणार आहे . प्रस्तुत अभ्यासासाठी सरकारी योजनेचे महत्व याचा आढावा घेण्यात येत आहे. महाराष्ट्र शासनाने महिलांसाठी विविध योजना लागू केल्या आहेत. सदर संशोधनामध्ये अश्या २० महिलांची सहेतुक निवड करण्यात आली आहे ज्या मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना आणि महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान या दोन्ही योजनांच्या लाभार्थी आहेत. या संशोधनात महिलांच्या सक्षमीकरणाचा अर्थ, आणि सरकारी योजनांचा प्रभाव यावर सखोल चर्चा केली आहे .

**प्रस्तावना**

आज कोणत्याही समाज्याची सध्याची परिस्थिती पाहायची झाल्यास त्या समाज्यातील स्त्रियांच्या दर्जाचा अभ्यास होणे गरजेचे आहे . आज समाज्यात महिला सक्षमीकरणाकडे सकारात्मकरित्या पहिले जाते .स्त्रीयांना मतदानाचा आधिकारसर्व प्रथम न्यूझीलंड या देशाने १८९३ साली दिला . न्यूझीलंडची संसद १९ सप्टेंबर १८९३ रोजी एक कायदा पारित करून महिलांना मतदानाचा हक्क प्रदान करणारा पहिला देश बनला . भारतात स्त्रीयांना सक्षम करण्यासाठी सर्व प्रथम समाजातील त्यांचे जे अधिकार आणि मुल्ये आहेत ते नष्ट करणाऱ्या विचारांना मारणे अत्यंत आवश्यक आहे .भारतात महिलांना २६ जानेवारी १९५० रोजी भारतीय राज्यघटना लागू झाल्यावर सार्वत्रिक मतदानाचा अधिकार मिळाला त्यानंतर १९५१ -५२ मध्ये झालेल्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीत भारतीय महिलांनी मोठ्या प्रमाणावर अधिकार बजावला . भारतीय राज्यघटनेच्या कलम १४ नुसार सर्व व्यक्ती कायद्यासमोर समान आहेत. कलम १५ नुसार जात, धर्म, लिंग इत्यादींच्या आधारे नागरिकांत भेदभाव केला जाणार नाही. तर १६ व्या कलमानुसार शैक्षणिक पात्रता असणाऱ्या स्त्री-पुरुषांस शासनात कोणतेही पद प्राप्त करता येईल. या हक्कांमुळे स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने सर्व क्षेत्रांत वावरताना दिसतात. स्त्रियांना राजकारणात सहभाग घेण्याचा, मतदान करण्याचा आणि निवडणुकीला उभे राहून निवडणूक लढविण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे. संयुक्त राष्ट्र संघटनेने १९७५ हे " आंतरराष्ट्रीय महिला वर्ष " म्हणून घोषित केले आहे . शांतता ,विकास आणि स्त्री पुरुष समानता ही या कार्यक्रमाची त्रिसूत्री होती . १९ व्या शतकात युरोपमध्ये औद्योगीकरण झपाट्याने वाढू लागले आणि पुरुषांबरोबर महिलाही या प्रवाहात सामील झाल्या. परंतु , हजारो वर्षांच्या परंपरेनुसार महिलांना दुय्यम स्थान मिळाले आणि पुरुषांप्रमाणे समान वेतन व समान सुविधांपासून त्यांना वंचित राहावे लागले. शिकागोमध्ये १८५७ मध्ये महिला कामगारांनी पुरुषांबरोबर समान वेतन मिळावे व कामाचे तास कमी व्हावेत याकरिता संप पुकारला होता. या लढ्याची आठवण म्हणून १९१० पासून ८ मार्च हा दिवस 'आंतरराष्ट्रीय महिला दिन' म्हणून जगभर साजरा होत आहे. महिला विकासात आर्थिक विकास हा महत्त्वाचा असल्यामुळे महाराष्ट्र शासनाने महिला आर्थिक विकास महामंडळाची स्थापना १९७५ मध्ये केली. कालांतराने १९७९ मध्ये संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आमसभेने महिलांबाबत भेदभाव दूर करणे, त्यांना समान दर्जा देणे यांबाबतचा ठराव केला. परंतु, भारताने यापूर्वीच ७३ वी, ७४ वी घटनादुरुस्ती करून स्थानिक स्वराज्य

संस्थांमध्ये महिलांसाठी १/३ आरक्षण ठेवण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. महाराष्ट्र हे अत्यंत पुरोगामी राज्य असल्यामुळे या सर्व घडामोडींचा सकारात्मक परिणाम झाला आणि जून १९९४ मध्ये महाराष्ट्रात पहिले महिला धोरण जाहीर केले. महाराष्ट्र हे महिला धोरण जाहीर करणारे भारतातील पहिले राज्य होय. आंतरराष्ट्रीय महिला वर्षाच्या निमित्ताने महिलांचे समस्या समोर आली व त्यांच्या सोडवणुकीची वाटचाल सुरू झाली. तथापि, १९७५ पासून दोन दशकांत प्रश्न सोडविण्याचे काहीसे उपचारात्मक होते. परंतु १९९४ च्या धोरणानुसार महिलांच्या मूलभूत प्रश्नांना हात घालण्यात आला. उदा., मालमत्तेत तिला हक्कदार बनविण्यात आले. वडिलांबरोबर आईचे नावही बंधनकारक झाले. अश्या अनेक योजना शासनाच्या योजनामुळे महिलांना सक्षम,आत्मनिर्भर बनविले जाते .यासाठी संशोधिकेने " महिला सक्षमीकरण आणि शासनाच्या योजना : एक समग्र दृष्टीकोन '' यातून अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे .

**संशोधनाची उद्दीष्टे आणि रचना :**

२.१ . **संशोधनाची उद्दीष्टे**

या संशोधनाचा उद्देश पुढील गोष्टी स्पष्ट करणे आहे:

- महिला सक्षमीकरण संकल्पना समजून घेणे .
- महिला सक्षमीकरणासाठी शासनाच्या योजनांचा शोध घेणे.
- महिला सक्षमीकरणाचे परिणामकारकतेची शोध घेणे.

**२.२ संशोधन प्रक्रिया**

सदर अभ्यासासाठी संशोधिकेने महिला सक्षमीकरण संकल्पना, महिला सक्षमीकरणासाठी शासनाच्या योजना , महिला सक्षमीकरणाचे परिणाम यांचा अभ्यास केला आहे . संशोधनाचा हा विषय महिलांच्या समाज्यातील विकासामध्ये भर टाकणारा आहे .सदर अभ्यासातून महिला सक्षमीकरण जनजागृतीसाठी प्रयत्न केला गेला आहे

**२.३. संशोधनाची पद्धत**

सदर संशोधन प्रामुख्याने सर्वेक्षण पद्धतीचा आणि वर्णनात्मक पद्धतीचा वापर करण्यात आला आहे

**२.४ . संशोधनाचे साधन**

सदर संशोधनासाठी संशोधिकेने प्राथमिक स्त्रोत म्हणून प्रश्नावलीचा साधनाच वापर केला आहे.

**२.५ . माहिती संकलन**

सदर अभ्यासाठी संशोधिकेने यासाठी दुय्यम साधनांचा वापर केला आहे . यामध्ये विविध पुस्तके,संशोधन पेपर, शासकीय प्रकाशने, शासकीय अहवाल ,यांचा सखोल अभ्यास करून त्यावर विश्लेषण करण्यात आले आहे.

**२.५ . संशोधन नमूना**

सदर संशोधनासाठी निवडण्यात आलेल्या दोन्ही योजनांचा लाभ घेणाऱ्या पट्टणकोडोली येथील अश्या २० महिलांची सहेतुक निवड संशोधन नमूना म्हणून केली आहे.

**अभ्यासाच्या उद्दिष्टानुसार प्रक्रिया**

सदर संशोधनाचे पहिले उद्दिष्ट महिला सक्षमीकरण संकल्पना समजून घेणे हे आहे.

**सक्षमीकरण अर्थ :**

एखाद्याला त्याच्या जीवनासंबंधीचे हक्क प्राप्त करून घेण्यासाठीची पात्रता त्यांच्यात निर्माण करणे म्हणजे सक्षमीकरण होय.
दुर्बलता नष्ट करणे म्हणजे सक्षमीकरण होय .

**महिला सक्षमीकरण अर्थ :**

पावलो फिरे यांनी महिला सक्षमीकरण सर्वप्रथम ही संकल्पना मांडली.जागतिक बँक (२००२ ): " व्यक्तींना किंवा गटांना आपली पसंती ठरविण्याचा व ही पसंती त्या कृतीमध्ये उत्तरविण्याची क्षमता वाढविण्याची प्रक्रिया म्हणजे सक्षमीकरण होय."

'व्हेनीस ग्रिफेण' (ई.स.१९४७ ): यूनोने आयोजित केलेल्या जागतिक पातळीवरील कार्यशाळेत 'केलेली व्याख्या "स्त्री सक्षमीकरण म्हणजे स्त्रियांच्या अंगी निर्णय घेण्याची, नियंत्रण व संघटन करण्याची, मत प्रदर्शित करण्याची कृतीशील कार्यक्रम घडवून आणण्याची, जनसंपर्क संस्था मार्फत आर्थिक व्यवहार करण्याची क्षमता व आवड स्त्रीयांमध्ये निर्माण होणे म्हणजे खऱ्याअर्थाने महिला सक्षमीकरण होय.

प्रस्तुत अभ्यासाद्वारे महिलांना सामाजिक ,आर्थिक ,राजकीय ,सांस्कृतिक ,शैक्षणिक ,धार्मिक व प्रशासकीय क्षेत्रात योग्य प्रमाणात सहभागी करून निर्णय प्रक्रियेत सामील करणे म्हणजेच महिला सक्षमीकरण होय असा अर्थ अभिप्रेत आहे .

**शासनाच्या योजना**

या संशोधनाचे दुसरे उद्दिष्ट महिला सक्षमीकरणासाठी शासनाच्या योजनांचा अभ्यास करणे. याद्वारे वेगवेगळ्या शासनाच्या योजनांचा आढावा घेणे . या शासनाच्या योजनांनचे उदिष्टे, कोणत्या साली सुरू झाल्या आणि अश्या योजना सुरू करण्यामागे शासनाचे उदिष्ट कोणते आहे . त्याचा कोणासाठी उपयोग होतो याचा अभ्यास या अभ्यासाच्या माध्यमातून प्रामुख्याने करण्यात आला आहे . सदर अभ्यासासाठी महाराष्ट्र शासना अंतर्गत राबवल्या जाणाऱ्या खालील दोन योजनांचा वापर केलेल्या आहे. सदर संशोधनामध्ये अश्या २० महिलांची सहेतुक निवड करण्यात आली आहे ज्या मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना आणि महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान या दोन्ही योजनांनच्या लाभार्थी आहेत.

**मुख्यमंत्री माजी लाडकी बहीण योजना**

महाराष्ट्र राज्याच्या २०२४ चा अर्थसंकल्पात सर्वात मोठी घोषणा म्हणजे " मुख्यमंत्री माजी लाडकी बहीण योजना '' महाराष्ट्रात ही योजना आणण्यात आली आहे . या योजनेनुसार महाराष्ट्रातील सर्व पात्र महिलांना आर्थिक मदत ₹ १५०० (प्रति महिना) व मुलींना आत्मनिर्भर व स्वावलंबी करण्याच्या , महिलांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे हे सरकारचे ध्येय आहे. मुख्यमंत्री माजी लाडकी बहीण योजना कोणाला लाभ मिळणार आहे, माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी महिला महाराष्ट्र राज्याच्या रहिवासी असणे आवश्यक आहे. महाराष्ट्र राज्यातील विवाहित ,विधवा, घटस्फोटित आणि निराधार महिला. महिलाचे किमान व २१ वर्षे पूर्ण आणि जास्तीत जास्त वय ६५ वर्षे पूर्ण होईपर्यंत. माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत लाभ घेणाऱ्या महिलेचे बँकेत खाते असणे आवश्यक आहे. लाभार्थी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न २.५० लाखापेक्षा जास्त नसावे. मुख्यमंत्री माजी लाडकी बहीण योजनेसाठी कोणत्या महिला असतील अपात्र , ज्या महिलांचे कुटुंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न अडीच लाखापेक्षा जास्त असतील. ज्या महिला कुटुंबातील सदस्य आयकर भरतात. कुटुंबातील सदस्य नियमित, कायम, कर्मचारी कंत्राटी कर्मचारी म्हणून सरकारी विभाग, उपक्रम, मंडळ किंवा भारत सरकार, राज्य सरकारच्या स्थानिक संस्थेमध्ये कार्यरत आहेत किंवा सेवा निवृत्तीनंतरचे वेतन घेत आहेत. लाभार्थी महिलेने शासनाच्या इतर भागातील आर्थिक योजना द्वारे लाभ घेतला असेल.
ज्या कुटुंबातील सदस्य विद्यमान किंवा माजी आमदार- खासदार आहे. ज्या कुटुंबातील सदस्यांमध्ये संयुक्तपणे पाच एकर पेक्षा जास्त शेतजमीन आहे. ज्याच्याकडे चार चाकी वाहन (ट्रॅक्टर वगळून) आहे.

**महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान**

याची स्थापना १८ जुलै २०११ रोजी निर्मिती झाली . या मंडळाची नोंदणी इंडियन सोसायटीज् रजिस्ट्रेशन ॲक्ट १८६० मधील तरतुदीनुसार करण्यात आली .याचे उद्दिष्टे महाराष्ट्रातील ग्रामीण गरीब कुटुंबांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवणे. स्वयंसहाय्यता गट स्थापन करून महिलांना उद्योजकतेसाठी प्रेरित करणे. गरिबी निर्मूलन आणि उपजीविकेच्या संधी निर्माण करणे. महिलांचे गट तयार करून त्यांना वित्तीय मदत व प्रशिक्षण देणे. याद्वारे उपजीविका कार्यक्रम आयोजन केले जाते जसे की ,शेती, पशुपालन, लघु उद्योग, आणि स्वयंरोजगार वाढविणे. यात वित्तीय समावेशन हे ग्रामीण भागातील गरजू कुटुंबांना बँकिंग व कर्जसुविधा उपलब्ध करणे. राज्यातील ३४ जिल्ह्यांतील ३५१ तालुके आणि २८९२ ग्रामपंचायतींमध्ये हे अभियान राबवले जात आहे. महत्वपूर्ण उपक्रम राबवले जातात त्यापैकी बांधकाम मजूर कल्याण योजना ,महिल उत्पादक कंपन्या स्थापन करणे, कौशल्यविकास आणि रोजगार प्रशिक्षण केंद्रे ,डिजिटल साक्षरता आणि मार्केटिंग मदत याची माहिती दिली जाते .

**शासनाच्या योजनांचा परिणाम**

सदर अभ्यासासाठी निवडण्यात आलेल्या मुख्यमंत्री माजी लाडकी बहीण योजना आणि महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान याद्वारे लाभ घेणाऱ्या अश्या २० महिलांची सहेतुक निवड संशोधनासाठी केली आहे .

वैयक्तिक माहिती आधारित यात जास्तीत जास्त महिलांचे वय हे ३६ ते ४५ वर्ष ४५ % हे असणाऱ्याचे प्रमाण जास्त दिसून आले . यातील महिलांचे शिक्षण याचा विचार करता असे दिसून आले कि, माध्यमिक शिक्षण घेतलेल्या स्त्रियांचे प्रमाण ६० % इतके अधिक दिसून आले. यात कुटुंबाचा मुख्य उत्पन्नाचा स्त्रोत शेती असलेल्या कुटुंबाचे ७०% अधिक प्रमाण दिसून आले .

**योजनांची माहिती व सहभाग ( मुख्यमंत्री माजी लाडकी बहीण योजना )**

या योजनांची माहिती सरकारी कार्यालय या द्वारे मिळालेल्या महिलांचे प्रमाण ५५ % इतके अधिक आहे .यात सोशल मीडिया द्वारे मिळालेल्या महिलांचे प्रमाण ४० % इतके आहे .

मुख्यमंत्री माजी लाडकी बहीण योजना आणि महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान याद्वारे योजनेच्या मदतीने व्यवसाय सुरू केलेल्या महिलांचे प्रमाण

| अनु. क्र | व्यवसाय | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | गृहउद्योग | २० % |
| २ | सेवाउद्योग | २५ % |
| ३ | लघु उद्योग | ३५ % |
| ४ | इतर | 20. % |

तक्ता क्रमांक १. शासकीय योजनेच्या मदतीने व्यवसाय सुरू केलेल्या महिलांचे प्रमाण

वरील तक्ता क्रमांक १ यामधून असे दिसून येते की, योजनेच्या मदतीने व्यवसाय सुरू केलेल्या महिलांचे सर्वाधिक ३५ % इतके प्रमाण हे लघु उद्योगात जास्त आहे . सेवाउद्योग करणाऱ्या महिलांचे प्रमाण २५ % आहे.यातून असे दिसते की , योजनेच्या मदतीने महिलांनी विविध प्रकारचे व्यवसाय सुरू केलेले आहेत.

योजना मिळण्यापूर्वी महिला काहीना काही काम करत होत्या त्यामुळे, योजनापूर्वीचे मासिक उत्पन्न जाणून घेण्याचा प्रयतान केला आहे . हे पुढील तक्तातून स्पष्ट होते .

| अनु. क्र | मासिक उत्पन्न | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | उत्पन्न नव्हते | २० % |
| २ | १००० – ५००० रु | ५५% |
| ३ | ५००० – १०,००० रु | १५ % |
| ४ | १०,००१ रु व अधिक | १० % |

तक्ता क्रमांक २ योजनापूर्वीचे मासिक उत्पन्न

तक्ता क्रमांक २ यामधून असे दिसून येते की, योजना मिळण्यापूर्वीचे मासिक उत्पन्न १००० – ५००० रु असणाऱ्यांची संख्या ५५% इतकी अधिक आहे. तर उत्पन्न नव्हते अश्या महिला २०% इतक्या असल्याचे आढळले . योजनानंतर महिलांच्या उत्पन्नात वाढ १०० % झाल्याचे दिसून येते .

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान

सदर अभ्यासाठी संशोधिकेने २० महिला यांचा समावेश या योजनेअंतर्गत १०० % असल्याचे दिसून येते . या महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान या मार्फत महिलांच्या आर्थिक साक्षरतेत वाढ झालेले दिसून येते याचे प्रमाण १०० % इतके असल्याचे दिसून येते .

तक्ता क्रमांक .३. महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत उपक्रमांमध्ये सहभाग झालेली महिला

| अनु. क्र | उपक्रम सहभाग | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | स्वयंरोजगार प्रशिक्षण | १५ % |
| २ | उद्योग कर्ज योजना | ६५ % |
| ३ | महिला बचत गट अर्थिक मदत | २० % |

तक्ता क्रमांक .३. वरुन महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियाना अंतर्गत उपक्रमांमध्ये सहभाग झालेली महिलांनी उद्योग कर्ज योजनेचा लाभ घेतलेल्या महिलांचे प्रमाण ६५ % इतके सर्वाधिक आहे .

आर्थिक स्वावलंबन व आत्मनिर्भरता तक्ता क्रमांक ४ .योजनांन अंतर्गत झालेल्या सुधारणा

| अनु. क्र | सुधारणाबाबी | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | कुटुंबाच्या गरजा पूर्ण करण्याच्या क्षमता | ९० % |
| २ | आर्थिक स्थैर्य | १० % |

तक्ता क्रमांक ४ . वरुन या योजने अंतर्गत झालेल्या सुधारणा यामध्ये कुटुंबाच्या गरजा पूर्ण करण्याच्या क्षमतेचे प्रमाण ९० % इतके सर्वाधिक आहे .

व्यवसाय वाढीसाठी मदत मिळावी असे ६० % महिलांचे मत आहे . आणि अधिक प्रशिक्षण मिळावे असे ४० % महिलांनी निर्देशित केले आहे .

भविष्यातील योजना आणि गरज

सदर प्रश्नावली द्वारे योजनांमध्ये सुधारणा आवश्यक आहे असे असणाऱ्या महिलांची संख्या १७ असून त्यांची टक्केवारी ८५ % अशी आहे . तर नाही असे मत असणाऱ्या महिलांची संख्या ३ इतकी आहे . त्याचे प्रमाण १५ % इतके आहे. यात महिलांचा भविष्यातील संधी विषयाचा दृष्टिकोण पाहण्यात आला तो पुढीलप्रमाणे ,

| अनु. क्र | भविष्यात संधी | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | गृहउद्योग | १५ % |
| २ | सेवाउद्योग | ३५ % |
| ३ | शेतीपुरक व्यवसाय | १५ % |
| ४ | अन्य | १० % |

तक्ता क्रमांक ५. भविष्यात संधी

सदर तक्ता तक्तातून क्रमांक ५. वरुन मध्ये महिलांना भविष्यातील योजना आणि गरज यात संधी मिळावी यासाठी सेवाउद्योग यात ३५ % प्रमाण , गृहउद्योग आणि शेतीपुरक व्यवसाय यासाठी १५ % प्रमाण आहे .

**निष्कर्ष**

महिला सक्षमीकरण म्हणजे महिलांना त्याच्या वैयक्तिक व सामाजिक,आर्थिक , राजकीय विकासासाठी स्वतःचे निर्णय घेण्यास सक्षम करणे तसेच महिलांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून देणे, त्यांना स्वावलंबी आत्मनिर्भर बनवणे, त्यांचे सर्व निर्णय स्वतः घेण्यास सक्षम करणे. सदर अभ्यासातून असे निर्देशित होते की महाराष्ट्र राज्याच्या २०२४ चा अर्थसंकल्पात सर्वात मोठी घोषणा म्हणजे " मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना " महाराष्ट्रात ही योजना आणण्यात आली आहे आणि महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान या सदर योजनेचा आत्मनिर्भर बनविण्यासाठी सकारात्मक परिणाम दिसून येतात .

**संदर्भ** :


1. माहिती व जनकल्याण महासंचालनालय, महाराष्ट्र शासन. (2023). शासन आपल्या दारी, महाराष्ट्राचा अर्थसंकल्प 2023-24. महाराष्ट्र शासन.
2. महिला व बालविकास विभाग. (2022). कार्यक्रम अंदाज पत्रक 2022-23. शासकीय फोटोझिंको मुद्रणालय.
3. आढाव, वि. (2010). महिला सबलीकरण. पुणे विद्यापीठ.
4. न्यू वॉइस पब्लिकेशन. (2016). महिला सबलीकरण: समस्या आणि अडचणी. छत्रपती संभाजीनगर.
5. Young Researcher Association. (2022). International Journal of Advance and Applied Research (IJAAR), 2(11), May-June. कोल्हापूर, महाराष्ट्र.
6. सकरगे, ना. (2016). महिला सक्षमीकरणात जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण समितीची भूमिका: एक समाजशास्त्रीय अध्ययन.
7. Hindustan Times Marathi. (2024, August 14). मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना: १ कोटी ७लाख महिलांच्या बँक खात्यात जमा झाली रक्कम. Hindustan Times.https://marathi.hindustantimes.com/
8. LatestLY Marathi. (2025, January). लाडकी बहीण योजना: २५ टक्के लाभार्थ्यांना योजना मिळणार नाही, सरकार दरमहा ९०० कोटी रुपये वाचवणार.LatestLY. https://marathi.latestly.com/
9. ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद): Zilla Parishad Kolhapur. (2023, November). महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (MSRLM) माहितीपत्रक. Zilla Parishad Kolhapur. https://www.zpkolhapur.gov.in/
10. Jawhar Zilla Parishad Palghar. (n.d.). उमेद अभियानांतर्गत व्यवसाय माहितीपत्रक. Jawhar Zilla Parishad Palghar. https://jawhar.zppalghar.in/
11. Divya Marathi. (n.d.). उमेद योजना: महिलांसाठी अर्ज प्रक्रिया, लाभ व फायदे. Dainik Bhaskar. https://divyamarathi.bhaskar.com/